**ठळक बातम्या**

- अहमदाबाद विमान अपघातानंतर सर्वत्र हळहळ/ अपघातस्थळाला प्रधानमंत्र्यांची भेट
- विमान दुर्घटनेचा अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळ तपास करणार
- इराणच्या अण्वस्त्र तळांवर इस्राएलचे हल्ले/ पश्चिम आशियात तणाव वाढला

**आणि**

- देशाच्या उत्तर भागात उष्णतेची लाट तर महाराष्ट्रासह दक्षिणेत मुसळधार पावसाचा इशारा

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी गुजरातमध्ये अहमदाबाद सरकारी रुग्णालयात विमान अपघातात जखमी झालेल्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन परिस्थितीचा आणि बचाव कार्याचा आढावा घेतला.

अहमदाबाद विमानतळावरून लंडनकडे निघालेलं विमान अवघ्या काही क्षणातच अहमदाबाद विमानतळाच्या जवळ कोसळल्याने काल हा अपघात झाला. या अपघातात १२ कर्मचाऱ्यांसह २४१ जणांचा मृत्यू झाला.

अहमदाबादमधल्या या दुर्घटनेचा आपल्या सर्वांना धक्का बसला आहे. इतक्या क्षणार्धात एवढे जीव गमावण्याचं दुःख शब्दात व्यक्त करता येणार नाही. सर्व शोकाकुल कुटुंबांच्या दुःखात आपण सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

दरम्यान, अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयात सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून गंभीररीत्या होरपळलेले काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली आहे.

अपघातस्थळी अजूनही मदतकार्य चालू आहे. मृतदेहांची ओळख पटवण्याचं कामही सुरु आहे.

या दुर्घटनेबद्दल जगभरातून शोक व्यक्त होत आहे. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी पीडितांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला आहे, अमेरिकेचे अध्यक्ष

डोनाल्ड ट्रम्प यांनी ही एक भयानक दुर्घटना असल्याचं म्हटलं आहे. ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. फ्रांस, रशिया, युक्रेन, मालदिव, कॅनडा, सिंगापूर या देशांच्या प्रमुखांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र सहवेदना व्यक्त केली आहे.

काल दुपारी १ वाजून ३९ मिनिटांनी या विमानानं उड्डाण केल्यानंतर लगेचच विमानाच्या वैमानिकानं 'मेडे'चा संदेश पाठवला होता, ज्यामध्ये विमानाच्या परिस्थितीबाबत अनिश्चिततेचा इशारा देण्यात आला होता. वैमानिक सुमित सभरवाल आणि फर्स्ट ऑफिसर क्लाईव्ह कुंदर यांच्या नेतृत्वाखाली या विमानाने उड्डाण केलं होतं. सभरवाल यांना ८२०० तासांचा तर कुंदर यांना अकराशे तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. या पार्श्वभूमीवर अपघाताची चौकशी केली जात आहे. विमान निर्माता बोईंग कंपनी एअर इंडियाच्या संपर्कात असल्याचं कंपनीनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या अपघातानंतर काल बोईंग कंपनीचे शेअर्स ४ टक्क्यांहून अधिक घसरले.

**<><><><>**

दरम्यान, या विमान दुर्घटनेच्या तपासात अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचे तपास पथक चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे, या तपासात भारतीय अधिकाऱ्यांना हे पथक मदत करणार असल्याचं सुरक्षा मंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये महाराष्ट्रातल्या सात जणांचा मृत्यू झाला आहे. यातले पाच जण एअर इंडियाचे कर्मचारी होते. वैमानिक कॅप्टन सुमित सभरवाल हे पवईचे रहिवासी होते. तर त्यांचे सहकारी दीपक पाठक हे बदलापूरचे रहिवासी होते. डोंबिवली इथल्या रोशनी सोनघरे, पनवेलच्या मैथिली पाटील आणि गोरेगाव, मुंबई इथल्या अपर्णा महाडिक हे कर्मचारीही विमानात होते. सांगली जिल्ह्यातले महादेव पवार आणि त्यांच्या पत्नी आशा पवार हे प्रवासीही या दुर्घटनेत मृत्युमुखी पडले आहेत.

**<><><><>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिश्री यांनी नवी दिल्ली इथं चीनचे उप परराष्ट्र मंत्री सन वेइडोंग यांची भेट घेतली आणि भारत-चीन द्विपक्षीय संबंधांमधील घडामोडींवर चर्चा केली. परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. बैठकीत आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रात परस्पर संबंधांना आणखी दृढ करण्यावर भर देण्यात आला. यावर्षी कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्यासाठी सहकार्य दिल्याबद्दल परराष्ट्र सचिवांनी आनंद व्यक्त केला . त्याचप्रमाणे दोन्ही देशांमधल्या वादग्रस्त विषयांवर सविस्तर चर्चा करून त्याचं निराकरण करण्यावरही दोन्ही नेत्यांनी एकमत दर्शवलं. दोन्ही देशांमधली थेट हवाई सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी जलदगतीनं पावलं उचलण्याचं या बैठकीत मान्य करण्यात आलं.

**<><><><>**

इसराएलने काल इराणच्या भूभागावर हल्ले केले त्यामुळे पश्चिम आशियात पुन्हा संघर्षाचे ढग जमले आहेत. इराणवरची ऑपरेशन रायझिंग लायन ही कारवाई आणखी काही दिवस चालू राहील, असं इसराएलचे प्रधानमंत्री बेन्यामिन नेतान्याहू यांनी म्हटलं असून इसराएलमधे आणीबाणी जाहीर केली आहे.

नातांझ या इराणचा अण्वस्त्र तळावर हल्ला करुन इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचा बीमोड केल्याचा दावा इसराएलनं केला आहे. इराणच्या इस्लामिक रेव्हल्यूशनरी गार्डचे प्रमुख जनरल होस्सेन सलामी इराणचे लष्कर प्रमुख, मोहम्मद बाघेरी आणि अणुउर्जा संस्थेचे माजी प्रमुख फेरेदून अब्बासी यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला.

इराणचं हवाईक्षेत्र तिथल्या सरकारनं पुढची सूचना मिळेपर्यंत बंद केलं आहे.

दरम्यान, ही कारवाई केवळ इसराएलनं केली असून अमेरिकेचा त्याच्याशी संबंध नाही, असं अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

इस्रायलनं काल रात्री इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर एअर इंडिया या विमान कंपनीनं आपली सोळा आंतरराष्ट्रीय उड्डाणं माघारी वळवली आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी निवास व्यवस्था आणि त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती एअर इंडियाने समाज माध्यमावर दिली आहे. तसंच नियोजित उड्डाणांपैकी कुठल्याही उड्डाणाचं तिकीट रद्द केल्यास किंवा वेळेत बदल केल्यास

त्यासाठी वेगळं शुल्क आकारलं जाणार नाही. सविस्तर माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन एअर इंडियानं केलं आहे.

**<><><><>**

इस्त्राएल आणि इराण मधल्या भारतीय दूतावास अधिकाऱ्यांनी सतर्क राहून परिस्थितीवर लक्ष ठेवावं अशा सूचना दूतावासांनी दिल्या आहेत. इस्त्राएलनं इराणवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या सूचना दिल्याचं दूतावासानं समाजमाध्यमांत लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. दोन्ही देशातल्या भारतीय नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावेत, सुरक्षित निवाऱ्यांच्या जवळपास राहावे तसंच पुढील काळातल्या सूचनांसाठी दूतावासाच्या समाजमाध्यम खात्यांवरचे संदेश पाहावेत असं आवाहन दूतावासानं केलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय तपास यंत्रणा- एनआयएनं अमृतसर पोलिस पोस्ट ग्रेनेड हल्ला प्रकरणात पंजाब आणि हरियाणामध्ये बब्बर खालसा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांशी संबंधित १५ ठिकाणी छापे टाकले आहेत.

पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यात एका पोलिस चौकीवर यावर्षी जानेवारी महिन्यात ग्रेनेड हल्ला झाला होता, या संदर्भात अमृतसर, तरणतारन, फिरोजपूर, पठाणकोट, कपूरथला, रूपनगर जिल्हे आणि हरियाणातील सिरसा इथं एनआयएनं झडतीसत्र राबवलं. या दरम्यान मोबाईल, डिजिटल उपकरणं आणि कागदपत्रांसह अनेक गुन्हेगारी साहित्य जप्त करण्यात आलं आहे.

**<><><><>**

जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रीका यांच्यात लंडन इथं लॉर्ड्सवर सुरु असलेल्या अंतिम लढतीच्या दुसऱ्या दिवस अखेर ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ८ गड्यांच्या मोबदल्यात १४४ झाली होती. दिवस अखेर ऑस्ट्रेलियाने २१८ धावांची आघाडी घेतली होती. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सनं उत्कृष्ट गोलंदाजी करत २८ धावांच्या मोबदल्यात ६ गडी बाद केले.

**<><><><>**

नेदरलँडमध्ये FIH हॉकी प्रो लीगच्या काल झालेल्या सामन्यात अर्जेन्टिनानं भारताचा १-२ अशा गुणांनी पराभव केला. भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंग बोटाच्या जखमेच्या कारणास्तव सामन्यात सहभागी होऊ न शकल्यानं उपकर्णधार हार्दिक सिंगनं या सामन्याचं नेतृत्व केलं. या सामन्यात भारत आता 15 गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.

**<><><><>**

जर्मनीतील म्युनिक इथं झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत भारतीय नेमबाज सिफ्ट कौर समराने काल महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. २३ वर्षीय सिफ्टने अंतिम फेरीत ४५३ पुर्णांक १ गुण मिळवत तिसरे स्थान पटकावलं.

**<><><><>**

कर्नाटकात अनेक भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. किनारपट्टीलगतचा भाग, उत्तरेकडील बेळगावी, धारवाड, गडग, हावेरी, दक्षिण अंतर्गत प्रदेशातील चिकमंगलूर, कोडगू, शिवमोगा आणि दावणगिरी इथं जोरादार वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला.

महाराष्ट्रातही पुणे कोल्हापूर सांगलीसह विविध जिल्ह्यात काल जोरदार पाऊस पडला. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, गोवा आणि महाराष्ट्रात येत्या २४ तासात तुरळक ठिकाणी अतिजोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तुरळक ठिकाणी ताशी ६० ते ७० किलोमीटर इतक्या वेगाने वारे वाहतील असा इशाराही देण्यात आला आहे. ईशान्येकडील राज्यातही पावसाचा अंदाज आहे.

देशाच्या उत्तर भागात मात्र उष्णतेची लाट आहे. हिमाचल प्रदेशात थंड हवेची ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिमला आणि मनालीमधेही तापमान वाढलं असून घामाच्या धारांनी स्थानिक हैराण झाले आहेत.

**//<><><><>//**